# PARLE MAHOTSAV

Organiser - **ADV. PARAG ALAVANI,** MLA, President - Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahotsav.com

PARLE MAHOTSAV

**<u>कृपया प्रसिद्धीसाठी</u>**

## मुलांच्या सर्वांगीण विकाससाठी पालकांनी पार्ले महोत्सवात मुलांना पाठवावे - खा. पूनम महाजन

मुंबई दि. २५ : आपल्या मुलांना घडविण्यासाठी पार्ले महोत्सवातील स्पर्धांमध्ये त्यांना जरूर आणा असे आवाहन भाजपा युवा मोर्चाच्या राष्ट्रीय अध्यक्षा व खासदार पूनम महाजन यांनी चित्रकला, हस्ताक्षर व बुद्धिबळ स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी केले. एका अनोख्या उपक्रमातून मोठे व्यासपीठ उपलब्ध केल्याबद्दल आमदार पराग अळवणी व त्यांच्या टीमचे त्यांनी अभिनंदन केले व त्या अगोदर प्रारंभी उपस्थित सर्वांच्या वतीने भारतरत्न स्वर्गीय अटल बिहारी वाजपेयीजी यांच्या ९५ व्या जयंती निमित्त त्यांना अभिवादन केले.

पार्ले महोत्सव हे कलावंत व क्रीडापटू घडवणारे मोठे व्यासपीठ असून अशी व्यासपीठं सर्वत्र निर्माण व्हावीत असे प्रतिपादन मुंबई उपनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी मिलिंद बोरीकर यांनी केले. २० व्या पार्ले महोत्सवामधील कला विभाग अंतर्गत विविध स्पर्धांच्या बक्षीस वितरण सोहळ्याचे उदघाटक या नात्याने ते बोलत होते. आपणही पार्ल्याचे रहिवाशी असून असे व्यासपीठ निर्माण झाले याचा सार्थ आनंदही असल्याचे त्यांनी सांगितले.

पार्ले महोत्सव सारख्या स्पर्धांमुळेच आपल्यातील गुण विकसीत झाले व त्यामुळेच आज पार्श्वगायीका म्हणून मी उभी आहे असे प्रतिपादन ख्यातनाम गायीका वैशाली सामंत यांनी केले. २० व्या पार्ले महोत्सवातील कला विभागातील विविध स्पर्धांच्या बक्षीस समारंभात त्या बोलत होत्या. मागील २० वर्षात पार्ले महोत्सवाचे स्वरूप भव्य होत असून स्पर्धकांसोबत आयोजक कार्यकर्त्यांची नवीन टीम सुद्धा घडते आहे. स्पर्धा मधून घडलेल्या माझ्या सारख्या गायीकेस ही फार समाधानाची बाब वाटते असेही त्या म्हणाल्या.

२० व्या पार्ले महोत्सवाच्या पाचव्या दिवशी साठ्ये महाविद्यालयातील प्रा. मोहनराव आपटे कला नगरी मध्ये संपन्न झालेल्या चित्रकला, हस्ताक्षर, गायन (हिंदी मराठी गाणी व कराओके), सुदृढ बालक तसेच बुद्धिबळ मधील ३६ विविध वयोगटात झालेल्या स्पर्धांमधून ३६ प्रथम पारितोषिकांसह सुमारे १६० बक्षिसे बहाल करण्यात आली. या प्रसंगी स्टार प्रवाह वाहिनीवरील 'अग्निहोत्र २' या नव्या मालिकेमधील कलावंत रश्मी अनपट, अनुराधा राजाध्यक्ष ह्यांनी रसिकांशी संवाद साधला व तद् नंतर स्टार प्रवाह वाहिनीवरील 'मी होणार सुपर स्टार' ह्या रिॲलीटी शो मधील कलाकार मकरंद देशपांडे, गणेश मेस्त्री, मोनिका दामले व तसेच गायन विभागातील कराओके स्पर्धेतील रिती भुसा, सृष्टी गुप्ता, श्रेयस नाडकर्णी ह्या विजयी स्पर्धकांनी गाणी सादर करून उपस्थितांची मनं जिंकली.

या प्रसंगी महाराष्ट्र टाइम्सचे संपादक अशोक पानवलकर, माजी महापौर अरुण देव, आचार्य पवनकुमार त्रिपाठी, माहिती अधिकार कार्यकर्ते अनिल गलगली, किरीट मेहता, माजी नगरसेवक महेश पारकर, अभिनेते संदीप कुलकर्णी इत्यादी मान्यवर उपस्थित होते.